नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/03/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

## जबरी चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

पोस्टे कन्हानः— अंतर्गत १२ किमी अंतरावर सिंगारदिप बस स्टॉप जवळ कन्हान दि. ०६/०३/२०२४ चे १०.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान **आरोपी नामे— १) दिनेश अरून माने, रा. कन्हान २) किशोर मुकेश मानवटकर** यातील आरोपीतांनी संगणमत करून तहसिलचे अधिकारी आहो आपल्यावर कार्यवाही करायची आहे. अशी बतावनी करून फिर्यादी नामे— आकाश भाउराव कांबळे, वय ३० वर्ष, रा. सोनार मोहल्ला पिपरी कन्हान यांचे जवळुन एकुण नगदी ११०००/— रू. हिसकावुन नेल्याचे रीपोर्ट वरून पास्टे कन्हान येथे अप. क्र. १९६/२४ कलम १७०, ३९२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद झाला होता.

दि. ०६/०३/२०२४ रोजी सदर गुन्हयाचे तपासात मिळालेल्या गोपनीय माहितीवरून कन्हान पोलीसांनी सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन आरोपींचा शोध घेवुन आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींनी विचारपुस दरम्यान गुन्हा केल्याचे कबुली दिली. त्यांचेकडुन ०२ मोबाईल ॲडरॉइड किंमती १०,०००/—रू., नगदी ११०००/—रू. गुन्हयात वापरलेली स्विफ्ट कार एम.एच—२७/ए.आर— ५६८१ किंमती ५,००,०००/—रू. असा एकुण ५२१०००/—रू. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक चव्हान मो. नं. ८८८८०९२४२७ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, पोलीस हवालदार हरीष सोनभद्रे, जमाल मुदस्सर, सचिन वेळेकर, अमोल नागरे यांनी केली आहे.

## लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळविणाऱ्या कळमेश्वर तालुक्यातील टोळीचा पर्दाफाश नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०६/०३/२०२३ रोजी श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांना मुखबिरद्वारे खबर मिळाली की, मौजा ब्राम्हणी येथे नितीन शंभलकर याचे घरी काही ईसम मोबाईल फोनद्वारे सट्टापटीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळवत आहेत त्यावरून त्यांनी पोउपनि मिलींग गेडाम पो.स्टे. खापा, त्याचे कार्यालयातील मपोहवा संगिता कोवे, पोशि नितेश पुसाम तसेच पो.स्टे. केळवद येथिल पोना दिपक इंगळे, व पोशि सैफुल्ला अहमद यांना त्यांचे कार्यालयात बोलावुन मार्गदर्शन करून रेड करणेकरीता रवाना केले. सदर पथकाने मिळालेल्या खबरेप्रमाणे जावुन धाड टाकली असता त्याठिकाणी १) तेजस नत्थुजी डाखोळे वय १८ वर्ष रा. वैशाली नगर वार्ड क्र. ०३ ब्राम्हणी कळमेश्वर २) स्वप्नील राजेन्द्र हेलोंडे वय २८ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ उबाळी ता. कळमेश्वर ३) सुमीत राजेन्द्र गोतमारे वय २८ वर्ष रा. घोराड ता. कळमेश्वर है फोनवर सट्टापट्टीचे आकडे लिहीतांना मिळुन आल्याने त्यांना विचारपुस केली असता त्यांनी दिनेश ठाकुर रा. कळमेश्वर व नितीन शंभलकर रा. कळमेश्वर यांचे सांगणेवरून त्यांचे मोबाईल फोन द्वारे बबन इंगोले रा. फेटरी येरला, महेन्द्र सोमकुवर रा. कळमेश्वर, नारायण गाठीबांधे रा. कळमेश्वर, मोरेश्वर कोकोडे रा. डोरली, शाकाल टोपननाव असलेला ईसम रा. पारडी ता. कळमेश्वर, जितु शंभलकर रा. उबाळी, अनिल पाटील रा. तेलगाव, नंदु रोडे रा. उबाळी, फिरदोस खान रा. मोहपा, तुकाराम नावाचा ईसमा आडनाव माहीत नाही रा. डोरली ता. कळमेश्वर, अरवींद आसुले रा. सेलु ता. कळमेश्वर, मेघराज खिडकीकर उर्फ सावजी रा. उबाळी ता. कळमेश्वर, चंद्रकांत पादाळे रा. कळमेश्वर, ताराचंद वाहने रा. कोहळी ता. कळमेश्वर, गणेश भलावी रा. कळमेश्वर, राहुल तांदुलकर रा. हुडको कॉलनी कळमेश्वर, मुकेश डहाड रा. सवंन्द्री, निलेश उर्फ आबु गहुकर रा. मोहपा, प्रदीप डहाट रा. मेटपांजरा, दिलीप पाटील रा. उबाळी ता. कळमेश्वर, विलास सावरकर रा. ब्राम्हणी झोपडपट्टी, सुरेश बन्सोड रा. मोहपा ता. कळमेश्वर, गणेश नावाचा ईसम आडनाव माहीत नाही रा. डोरली ता. कळमेश्वर, खुशाल वाकडे रा. उबगी, रोहीत भलावी रा. ब्राम्हणी, राजेश शंभलकर रा. उबाळी यांचेकडुन त्यांनी दिवसभर वेगवेगळया गावात बसुन लोकांकडुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळवुन ते आकडे व रकमाबाबतची माहीती घेवुन ते कागदांवर नोंदवित असल्याचे सांगितले. तिन्ही आरोपींकडुन वेगवेगळया कंपनीचे मोबाइल, दोन CITIZEN कंपनीचे कॅल्कुलेटर, सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले व त्यांचे हिशेबाबतचे कागदपत्रे तसेच दोन मोटरसायकल असा एकुण १,४२,४८५/— रु. चा माल जप्त करण्यात आला असुन सर्व आरोपींविरूध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम ४, १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा सहकलम १०९ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

घटनास्थळी मिळुन आलेल्या सट्टापट्टीच्या हिशोबाच्या कागदपत्रांवरून दिनेश ठाकुर, रा. कळमेश्वर व नितीन शंभलकर रा. कळमेश्वर यांचा साप्ताहिक नफा सरासरी १५,००००/— रु. पेक्षा जास्त असल्याचे दिसुन येत असुन ते अशाप्रकारे आपली टोळी तयार करून गावागावांमध्ये आपली माणसे बसुन लोकांकडुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळवितात व गावातील तरुणांना जुगाराच्या सवई लावुन त्यांचे भविष्य अंधारात टाकण्याचे काम ही टोळी करीत आहे.

सदरची कार्यवाही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात पोउपनि मिलींद गेडाम, मपोहवा संगिता कोवे, पोना दिपक इंगळे, पोशि नितेश पुसाम व पोशि सैफुल्ला अहमद यांनी केलेली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**